# मागासवर्गीय कल्याणकारी योजन

पुणे महानगरपालिकेने सन १९९२–९३ पासून मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत ५% तरतुद आपल्या अंदाजपत्रकात करण्यात सुरुवात केली आहे. सन २००० मध्ये सदर योजनेच्या मुलभूत फरक करण्यात येऊन मा.मुख्य सभेच्या मान्यतेने नवीन योजना अंमलबजावणी करणेस मान्यता घेणेत आलेली आहे. पुणे महानगरपालिकेने मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. दरवर्षी अंदाजपत्रकात खास निधीमधून यु.सी.डी. अंतर्गत मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबविणेस तरतुद उपलब्ध करुन देणेत येते. या व्यतिरिक्त ग.व.नि खात्याला मागासवर्गीय लोकसंख्या जास्त असलेल्या झोपडपट्टयांमध्ये मुलभूत सेवा पुरविणेसाठी आर्थिक तरतूद देणेत येते व त्याचा विनियोग ग.व.नि. खात्यामार्फत करण्यात येतो.

दिवसेंदिवस कमी होत जाणाऱ्या नोकऱ्यांच्या मागे मागासवर्गीय तरुण, तरुणींनी न जाता मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगार करावा, यासाठी विविध ४० प्रकारच्या व्यवसाय प्रशिक्षण न.वि. गाडगीळ व्यवसाय प्रशिक्षण संस्था सुरु करुन करणेत आलेले आहे. या प्रशिक्षण संस्थेचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन तसेच शहरातील विविध भागात राहत असलेल्या मागासवर्गीय तरुण–तरुणींना मध्यवस्तीत प्रशिक्षणासाठी येणारा त्रास कमी करणेचे दृष्टीने नव्याने सहकारनगर येथील वि.स.खांडेकर प्रशाला व हडपसर येथील मनपा वाहन परिवहन उपक्रम यांचे इमारतीत प्रशिक्षण सुरु करणेत आले आहे. प्रशिक्षण पुर्ण केलेल्या मागासवर्गीय तरुण, तरुणींना स्वतःच्या पायावर उभे राहणेसाठी, स्वयंरोजगार करणेसाठी रु. १००००/– पर्यंत वैयक्तिक अनुदान देणेत येते. तसेच आवश्यकतेनुसार व्यवसायाचे किटस्ही देणेत येते.

१. **<u>मागासवर्गीय लोकांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण</u> –** १८ ते ४५ वयोगटातील तरूण–तरूणींना मोफत प्रशिक्षण व प्रशिक्षण काळात मासिक बस पास दिला जातो.
२. **<u>महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायकली</u> –** घरापासून महाविद्यालयीन अंतर २ कि.मी. असेल तर मोफत सायकली दिल्या जातात.
३. **<u>महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका अंतर्गत अर्थसहाय्य</u> –** दररोज २ तास सामाजिक उपक्रमात काम करणे अपेक्षित. दरमहा रू. ५००/– अर्थसहाय्य.
४. **<u>घाणभत्ता घेणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य देणे</u>** :–मनपा कर्मचारी ज्यांना घाणभत्ता मिळतो अशा सेवकांच्या माध्यमिक शिक्षण घेत असणाऱ्या जास्तीत जास्त दोन मुलांसाठी शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य रू. ५०००/– प्रत्येकी देण्यात येते.
५. पुणे मनपाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मागणीप्रमाणे उपलब्ध करून दिले जाते.
६. **<u>अभ्यासिकेची सोय करणे</u> –** इ. ५ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांसाठी तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शनाखाली शालेय वेळेनंतर अभ्यासिकेची सोय केली जाते. शिक्षकांना दरमहा रू. २०००/– मानधन दिले जाते. अभ्यासिकेत आवश्यक ते शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले जाते.
७. **<u>गुणवत्ता वाढ</u>–** इ. ९ वीत ५० टक्के गुण मिळाले असल्यास व वाल्मिकी समाजातील ४५ टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना इ. १० वीसाठी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य रु.५,०००/– दिले जाते.

८. **<u>ग्रंथालय–</u>** शहरातील ४ ठिकाणी ग्रंथालय सुरू करणेत आले असून रू. १००/– डिपॉझिट घेऊन दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. मासिक शुल्क नाही. स्थळ खालील प्रमाणे–

१ हुतात्मा स्मारक, आर.टी.ओ.ऑफीस समोर, येरवडा, पुणे–०६

२ संत ज्ञानेश्वर समाज मंदिर, भवानी पेठ, पुणे–४२

३ कुसाळकर अभ्यासीका, कुसाळकर पुतळ्या समोर, गोखलेनगर, पुणे–१६

९. १८ ते ४५ वयोगटातील बेरोजगारांना विविध व्यवसायाची संधी आणि व्यवसाय प्रशिक्षणाची संधी याबाबत उद्योजकता शिबीराबाबत मार्गदर्शन केले जाते.

१०.मागासवर्गीय १८ ते ४५ वयोगटातील महिला व पुरूषांना स्वयंरोजगारासाठी रू. १०,०००/– पर्यत अनुदान दिले जाते.

११. **<u>लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक अर्थसहाय्य योजना (इ. १० वी) –</u>** इ. १० वी मध्ये ७० टक्के मार्कस मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी वर्षभरात केलेल्या खर्चासाठी जास्तीत जास्त रू. १५०००/– अनुदान देणेत येते.

१२. **<u>डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसहाय्य योजना (इ. १२ वी) –</u>** इ. १२ वी मध्ये किमान ७० टक्के मार्कस मिळालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी वर्षभर केलेल्या खर्चापोटी जास्तीत जास्त रू. २५०००/– अनुदान देणेत येते.

१३. **<u>१२ वी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य</u> –** इ. ११ वीत ६० टक्के गुण मिळाले असल्यास विद्यार्थ्यांना इ. १२ वीसाठी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य रु. १०,०००/– दिले जाते.

१४. **<u>इ. १२ साठी सीईटीसाठी अर्थसहाय्य:–</u>** जे विद्यार्थी सीईटी परिक्षेला बसतात अशा विद्यार्थ्यांना सीईटीच्या तयारीसाठी रू. १०,०००/– अर्थसहाय्य देणेत येते. ( टिप:– अ.क्र १३ व अ.क्र.१४ पैकी एका योजनेचा लाभ घेता येईल.)

१५. **<u>उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य:–</u>** जे विद्यार्थी व्यवसायिक शिक्षण घेत असतील व मागील परिक्षेत ६० टक्के गुण मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य दिले जाते. उदा. कॉम्प्युटर सायन्स मेडिकल, इंजिनिअरिंग इ. त्यांच्या प्रशिक्षण काळात सतत उत्तीर्ण झाल्यास दरवर्षी रू. १००००/– अर्थसहाय्य दिले जाते.

१६.**<u>व्यसनमुक्ती साठी अर्थसहाय्य:–</u>** १८ ते ४५ वयोगटातील युवक अंमली पदार्थाच्या आहारी गेल्यास त्यांना त्या पासून मुक्त करणेसाठी शासनमान्य अथवा मान्यताप्राप्त व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी जास्तीत जास्त रू. ७,०००/– अनुदान देणेत येते.

१७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील विद्यार्थ्यांना जेवणासाठी होणारा खर्च पुणे महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना अंतर्गत ५०% खर्च मागासवर्गीय कल्याण निधीतून अनुदान म्हणून देण्यात येते.

१८.**<u>स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रे मार्गदर्शन –</u>** सन २०१०–११ पासून सदरची योजना कार्यान्वीत झाली असून पदवीधर मागासवर्गीय मुलांना एमपीएससी/युपीएससी परिक्षांसाठी मार्गदर्शन मिळणे व सदर मुलांना स्पर्धेमध्ये यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन करणे हा योजनेचा उद्देश आहे. सदरचे केंद्र पुणे विद्यापीठ मार्फत सुरू आहे.

१९.**<u>वैयक्तिक नळ कनेक्शनसाठी अर्थसहाय्य-</u>** नळ कनेक्शनसाठी रू. ५०००/- पर्यत अनुदान दिले जाते. (ही योजना क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविली जाते)

२०.**<u>झोपडी दुरूस्तीसाठी अर्थसहाय्य-</u>** - झोपडी दुरूस्तीसाठी रू. १०,०००/- पर्यत अनुदान दिले जाते. (ही योजना क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविली जाते)

२१.**<u>वीज कनेक्शनसाठी अर्थसहाय्य -</u>** मागासवर्गीय नागरिकांना त्याचे वीज कनेक्शनसाठी रू. ५०००/- अर्थसहाय्य दिले जाते. (ही योजना क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविली जाते)

२२.**<u>सुलभ शौचालय बांधणेसाठी अर्थसहाय्य</u>** - मागासवर्गीय नागरिकांना सुलभ शौचालय बांधणेसाठी रू. १५०००/- अर्थसहाय्य दिले जाते. (ही योजना क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविली जाते)

# महिला बाल कल्याण योजना

१. **महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण :–**१५ ते ४५ वयोगटातील मुली व महिलांसाठी विविध व्यवसायाचे प्रशिक्षण मोफत दिले जाते. या प्रशिक्षण कालावधीतील जाणे येणेचा खर्च (मासिक बस पास खर्च दिला जातो. यासाठी रू. ५००/– अनामत भरावी लागते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर अनामत रक्कम परत केली जाते.) तसेच टुल किट देण्यात येतात.

२. **महिलांसाठी स्वयंरोजगार योजना :–**१८ ते ४५ वयोगटातील महिलांना स्वयंरोजगारासाठी रू. ५०००/– पर्यत अनुदान दिले जाते. बचत गटातील कुटुंबाना प्राधान्य.

३. **महिलांसाठी उद्योजकता विकास शिबीर :–**१८ ते ४५ वयोगटातील महिलांना विविध रोजगारांच्या व प्रशिक्षणाच्या उपलब्ध संधीबाबत उद्योजकता विकास शिबीराचे आयोजन करणेत येते.

४. **बचत गटांना १ वर्ष पुर्ण झाल्यांनतर फिरता निधी देणे:–**समाज विकास विभाग अंतर्गत स्थापन झालेल्या १ वर्ष पुर्ण झालेल्या बचत गटांना प्रत्येक सभासदाप्रमाणे रु. १०००/– प्रमाणे गटाला फिरता निधी देणेत येतो. अर्थसहाय्य एकदाच दिले जाते.

५. **शेजार समुह गटातील गट स्वयंसेविकांना प्रशिक्षणः–** शेजार समुह गटात जनजागृतीसाठी विविध आरोग्य विषयक, शैक्षणिक, सामाजिक इ. वर कार्यक्रम आयोजित करुन माहिती देणे.

६. **बचत गटांना प्रदर्शन व विक्रीसाठी अर्थसहाय्य :–** सदर योजना नागरवस्ती योजना मार्फत पुरस्कृत बचत गटातील सभासंदापुरतीच मर्यादीत असून प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या बचतगटांना किमान एक वर्ष पुर्ण झालेले असणे आवश्यक आहे तसेच बचतगटांचा व्यवहार नियमित सुरू असावा. दरवर्षी साधारणतः १००० गट विविध प्रदर्शनामध्ये सहभागी होतात. शासनाने / सेवाभावी संस्थेने आयोजित केलेल्या प्रदर्शन व विक्रीसाठी येणाऱ्या खर्चाचे ८०% अनुदान किंवा कमाल रू ५०००/– पर्यंतचे भाडे देता येईल.

७. **इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनींना खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य :–** इयत्ता ९ वी मध्ये ५०% गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीनींना इ. १० वी साठी खाजगी क्लासकरिता रु. २,०००/– पर्यत अर्थसहाय्य दिले जाते.

८. **इ. १२ वीतील विद्यार्थीनींना खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य :–**इ. ११ वी मध्ये किमान ६०% गुण मिळवून उत्तीर्ण विद्यार्थीनींना खाजगी क्लासची फी र. रू. १००००/– पर्यंत दिली जाते.

९. **सी.ई.टी. परिक्षेसाठी अर्थसहाय्य :–**प्रत्येक लाभार्थीला सी. ई. टी. र. रू. १०,०००/– पर्यंत अनुदान दिले जाते. खाजगी क्लास किंवा सी. ई. टी. यापैकी एका योजनेचा लाभ घेता येईल.

१०.**उच्च शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन मुलींना उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य :–** वैद्यकीय, संगणकविषयक, इंजिनिअरींग, एम.बी.ए. इ.पदविका, पदवी व तत्सम शासनमान्य संस्थेत व्यावसायिक शिक्षण घेणेसाठी शिक्षणाच्या पूर्ण कालावधीत दरवर्षी रु.१००००/– अर्थसहाय्य (प्रत्येक वर्षी किमान ६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाल्यास दिले जाते.

११.**कमवा व शिका :–**महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरूणींना कमवा व शिका योजनेअंतर्गत दरमहा रू. ५००/– अर्थसहाय्य दिले जाते. मात्र अशा विद्यार्थ्यांनी दररोज दोन तास समाजासाठी काम करावे लागते. उदा. प्रौढ शिक्षण वर्ग घेणे इ. बचत गटातील कुटुंबाना प्राधान्य.

१२.**माध्यमिक शाळेतील इ. ८ वी ते १० विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक साहित्य पुरविणे :–म**नपाच्या माध्यमिक शाळेतील इ. ८ वी ते १० तील विद्यार्थीनींसाठी शाळेच्या मागणीनुसार दरवर्षी शैक्षणिक साहित्य दिले जाते.

**१३.बाल विकास केंद्र :**–६ ते १३ वयोगटातील मुलांमुलीसाठी बाल विकास केंद्र बचत गटांच्या सहकार्याने १० महिने चालविले जाते. यामध्ये मुलांचा सर्वांगीण विकास, गाणी, गोष्टी इ. मार्फत केला जातो.

**१४.योगासन वर्ग –**महिलांचे आरोग्य चांगले राहणेसाठी महिलांचे मागणीनुसार झोपडपट्टीत नव्याने योगासन वर्ग सुरू करणेत आलेले आहे. सकाळ व दुपारचे सत्रात योगासन वर्ग सुरू केले जातात.२० महिलांनी मागणी केल्यानंतर योगासन वर्ग सुरू केला जातो व योग शिक्षिकेला रू. ५००/– मानधन दिले जाते. व प्रत्येक महिलेकडून रू. २०/– शुल्क आकारणेस व ते घेणेस योगशिक्षिकेला परवानगी देणेत आलेली आहे.

**१५.**ब**चत गटातील महिलांनी एक किंवा दोन मुलींवर कुंटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास अनुदान –**एका मुलीवर रू. १००००/– व दोन मुलींवर प्रत्येकी ५०००/– प्रमाणे रक्कम यूनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या वैकल्पित ग्रोथ फंडात १८ वर्ष मुदतीत गुंतविण्यात येणार आहे. १९ वर्ष पुर्ण झाल्याशिवाय सदर रक्कम काढता येणार नाही. १८ वर्षाचे आत मुलीचे लग्न केल्यास रक्कम मनपाकडे वर्ग करणेत येईल.

**१६.पाळणाघर –**लाल बहादूर शास्त्री प्राथमिक शाळा, कॉंग्रेस हाऊस मागे, शिवाजीनगर, पुणे ५ येथे मनपा सेवकाचे मुलांसाठी व नागरिकांच्या मुलांसाठी पाळणाघर चालविले जाते. सदर पाळणाघरासाठी मनपा सेवकाना रू. १००.०० व नागरिकांना रू. १५०.०० शुल्क आकारणेत येते. सदर पाळणाघर सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० पर्यत सुरू असते. एकावेळी ३० मुलांची सोय या पाळणाघरात होऊ शकते. सदर पाळणाघर ३ महिनेपासून ५ वर्षापर्यतचे मुलांसाठी आहे.

**१७.घरटं प्रकल्प:–** रस्त्यावरील मुलांसाठी घरटं हा निवासी प्रकल्प सुरू असून सध्या ३ प्रकल्प सुरू आहेत. त्यामध्ये सुमारे ३०० विद्यार्थी आहेत.

**१८.कन्यारत्न योजना –** इतर योजनेप्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुलींकरीता योजना आहे. यात

1. प्रत्येक मुलीची नोंदणी कन्यारत्न म्हणून तिच्या पहिल्या वाढदिवसा अगोदर करणेत येईल.
2. पाचवी पास झाल्यानंतर मुलीला रू. २०००/–
3. ८ वी पास झाल्यानंतर रू. ४०००/–
4. १० वी पास झाल्यानंरत रू. ७५००/–
5. इ. ११ वी १२ वी मध्ये शिकत असताना मुलीला दरमहा २००/– रू.
6. १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर मुलीच्या लग्नासाठी किंवा उच्च शिक्षणासाठी १,००,०००/– रू. मिळतील.

**१९.कागदी पिशव्या तयार करणाऱ्या बचत गटांना अनुदान –** बचत गटातील महिलांना कागदी पिशव्या तयार करणेसाठी प्रशिक्षण देण्यात येते.

**२०. शहरात महिला सबलिकरण केंद्र उभारणे –**कौटुंबिक सल्ला व मार्गदर्शन केंद्र, महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन, समुपदेशन (विधवा, परितक्त्या, घटस्फोटित, निराधार इ.), महिलाविषयक काम करणाऱ्या संस्थांची माहिती, महिला दक्षता कमिटी संदर्भांत माहिती, शिवाजीनगर न्यायालय वैकल्पिक वाद निवारण केंद्राची माहिती, दबावगट निर्मितीसाठी मार्गदर्शन, स्वसंरक्षण प्रशिक्षण, नागरवस्ती विकास योजना विभागाच्या महिलांसाठीच्या सर्व योजना, म.न.पा आरोग्य विभागाच्या महिलांसाठीच्या सर्व योजना, महिलांचे संघटीकरण, समाजातील लोकांची मानसिकता बदलणे, आर्थिक सक्षमीकरण, स्त्रि अस्तित्वाची ओळख, महिलांमधील निर्णय क्षमता, उल्लेखनिय काम करणाऱ्या महिलांचे मार्गदर्शन, महिलांनी स्वतः घ्यावयाची काळजी, शासनाच्या सर्व योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाच्या पातळीवर १५ महिला सबलीकरण केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे.

**२१.महिलांसाठी पथदर्शी इन्कुबेशन सेंटर उभारणेः–** पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सदर प्रकल्प राबविला जात आहे. यामध्ये महिलांसाठी व्यवसाय मार्गदर्शन, मार्केटिंग, कौशल्य, विक्री व्यवस्थापन, पॅकेजिंग, ब्रॅडींग, कारखान्यांना भेटी, उद्योगसंधी, ग्रुप चर्चा इ. बाबत प्रशिक्षण दिले. प्रत्येक महिन्याला किमान १ बॅच पाठविली जात आहे.

**२२. महिला स्वसंरक्षणः–** १५ ते २५ वयोगटातील युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याची योजना कार्यान्वीत आहे. शासन निर्देशानुसार पुणे महानगरपालिकेने १५ ते २५ वयोगटातील महिलांसाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणेकरीता विभाग अंतर्गत शासन मान्य संस्थांचे प्रस्ताव मागवून प्रशिक्षण देणेबाबत धोरण तयार करणेत आले असून प्रशिक्षित मास्टर ट्रेनर मार्फत शहरामध्ये सुरूवातीस महानगरपालिका माध्यमिक शाळेत प्रशिक्षण देणे सुरू आहे. नंतर वस्ती पातळीवर कायमस्वरूपी वर्ग सुरू केले जाणार आहेत.

**२३.मुलगी दत्तक योजना :–** देशामध्ये मुलींचे जन्मदरात घट होत आहे. पुणे शहरामध्ये दर १,००० पुरूषांमागे महिलांचे प्रमाणे ९३८ इतके आहे. दर हजारी महिलांचे प्रमाण वाढावे व स्त्री भ्रूण हत्या रोखली जावी; यासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर 'लाडकी लेक दत्तक योजना' सुरू करणेत आली आहे. एप्रिल २०१३ नंतर सन २०१३–२०१४ या आर्थिक वर्षापासून जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलीमागे लोकसहभागातून रक्कम रू. १० हजार व महानगरपालिकेचे रक्कम रू. २० हजार असे एकूण रक्कम रू. ३० हजार राष्ट्रीयकृत बँकेत दामदुप्पट योजनेमध्ये ठेवणेत येतील. तसेच या योजने अंतर्गत पालकाने स्वतः किंवा लोकसहभागातून जमा केलेली रक्कम रू. १० हजार व पुणे महानगरपालिकेचा हिस्सा रक्कम रू. २० हजार च्या दुप्पट रक्कम (र. रू. ४० हजार) असे एकूण रक्कम रू. ५० हजार एका मुलीवर कुटुंब नियोजन केल्यास राष्ट्रीयकृत बँकेमध्ये मुलीच्या नावे दामदुप्पट योजनेत गुंतविणेत येईल. सदरची रक्कम लाडक्या लेकीच्या लग्नासाठी, उच्च शिक्षणासाठी व भवितव्यासाठी वापरता येईल.

**२४. अनैतिक व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनासाठी व्यवसाय प्रशिक्षण योजना :** –अनैतिक व्यवसायात गुंतलेल्या महिलांना सन्मानाने जगता यावे, यासाठी पुणे महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अनैतिक व्यवसाय करणाऱ्या महिलांकरिता बुधवार पेठ येथे स्पोकन इंग्लिश, केटरिंग (विविध प्रकारचे मसाले तयार करणे इ. प्रशिक्षण), बेसिक व ॲडव्हान्स शिवण काम या तीन विषयांचे प्रशिक्षण सुरू करणेत आले आहे.

**२५.महिला सक्षमीकरण विधवा अनुदान** –अचानक वैधव्य प्राप्त झालेल्या महिलांना रु. १००००/– अर्थसहाय्य देणेत येते.

# युवक कल्याणकारी योजना

१. **स्वयंरोजगारासाठी अनुदान :–** १८ ते ४५ वयोगटातील युवकांना स्वत:चा स्वयंरोजगार सुरू करावयाचा असल्यास अथवा सुरू असलेल्या व्यवसायासाठी रक्कम रू. ५०००/– अर्थसहाय्य दिले जाते.

२. **उच्च तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य :–** युवक व युवतींना उच्च तांत्रिक शिक्षण उदा. कॉम्प्युटर, इंजिनिअरींग, मेडीकलसाठी अर्थसहाय्य देणेची योजना आहे. इ. १० वी व इ.१२ वी नंतरच्या वैद्यकीय अभियांत्रिकी/ संगणकीय/व्यवस्थापन/विधी पदवीसाठी दरवर्षी ६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्यास कोर्सचा कालावधी असेपर्यंत दरवर्षी रक्कम रू. १०,०००/– अनुदान देणेत येईल. तथापि पदविकांचे शिक्षण घेत असलेल्या तांत्रिक प्रशिक्षणासाठी अनुदान एकदाच देण्यात येईल. यासाठी रक्कम रू. १०,०००/– अनुदान दिले जाते.

**३. इ.१२ वी तील विदयार्थ्यांसाठी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य :–** चालू शैक्षणिक वर्षात इ.१२ वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना इ.११ वीत ६०% अधिक गुण मिळालेले असल्यास इ.१२ वी साठी खाजगी क्लाससाठी रक्कम रू. १०,०००/– अर्थसहाय्य दिले जाते. फक्त कॉमर्स व शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यानीच अर्ज करावेत.

४. **सी.ई.टी परिक्षेस बसण्यासाठी अर्थसहाय्य :–** चालू शैक्षणिक वर्षात इ.१२ वीत प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना सी.ई.टी. परिक्षेसाठी प्रवेश शुल्कासाठी रक्कम रू. १०,०००/– अर्थसहाय्य दिले जाते. इ.११ वीत ६०% अधिक गुण मिळालेले असणे आवश्यक आहे.

५. **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक अर्थसहाय्य योजना (इ. १० वी) –** इ. १० वी मध्ये ८० टक्के मार्कस मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी जास्तीत जास्त रू. १५०००/– अनुदान देणेत येते.

६. **डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसहाय्य योजना (इ. १२ वी) –** इ. १२ वी मध्ये किमान ८० टक्के मार्कस मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी जास्तीत जास्त रू. २५०००/– अनुदान देणेत येते.

# अपंग कल्याणकारी योजना

समाजातील दृष्टीहीन, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मनोविकलांग अंध/अपंग व्यक्तिंकडे त्यांच्या अपंगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून त्यांच्यामधील असलेले सुप्त सामर्थ्य विकसित करून त्यांना समाज जीनवाच्या सर्व अंगांमध्ये समानसंधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग अधिनियम १९९५ कलम ६२ आणि ६३ नुसार पुणे महानगरपालिकेने सन २०१०-११ पासून मा. मुख्य सभा ठराव क्र. ५३० दि. २५.१०.२०११ रोजी मान्यता देणेत आली असून त्यानुसार अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत ३% तरतुद आपल्या अंदाजपत्रकात करणेत येत आहे.

१. **मोफत बस पास योजना:-** पुणे मनपा हद्दीत राहणाऱ्या सर्व प्रकारच्या अपंग व्यक्तिंना बसपास देणेत आहे.
२. **अपंगांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य:-** ज्या अपंग व्यक्ति १८ ते ४० वयोगटातील असतील व ज्यांची स्वयंरोजगार करणेची क्षमता आहे. अशा व्यक्तिंना स्वयंरोजगारासाठी रू. ५०००/- अर्थसहाय्य देणे.
३. **व्यवसाय प्रशिक्षण:-** ज्या अपंग व्यक्तिंना समाज विकास विभागामार्फत व्यवसाय प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण मिळणार नाही, मात्र त्यांनी अशा खास प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेमधून अपंगांनी प्रवेश घेतला असेल आणि तसेच ज्या संस्थेत प्रवेश घेतला असेल ती संस्था शासनमान्य अधिकृत संस्था असेल तर अशा अपंग व्यक्तिंना रू. १०,०००/- प्रशिक्षण खर्चापोटी देणे.
४. **उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य:-** जे अपंग विद्यार्थी इ. १० व इ. १२ वी नंतर तांत्रिक, वैद्यकिय, इंजिनिअरींग, व्यवस्थापकीय, संगणकीय, किंवा इतर उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतील अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रशिक्षण कालावधी पर्यंत दरवर्षी रू. १०,०००/- अर्थसहाय्य देणे मात्र सदर अपंगांने दरवर्षी परिक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच ज्या संस्थेत प्रवेश घेतला असेल ती संस्था शासनमान्य अधिकृत असणे बंधनकारक राहिल.
५. **अंध, अपंग, विकलांग व्यक्तिंना कृत्रिम अवयव घेणेसाठी योजना:-** अंध , अपंग, विकलांग मुकबधिर व तत्सम अपंग व्यक्तिंना आपले दैनंदिन काम करताना उपयोगी पडणारे कृत्रिम साधनांसाठी अर्थसहाय्य देणे . उदा. कृत्रिम पाय, तीन चाकी सायकल, अथवा उपकरणाची जी किंमत असेल ती किंमत अथवा जास्तीत जास्त रू. २०,०००/- अर्थसहाय्य एकदाच देणे.